## नियमित फौजदारी खटला क्र.३७/२०२२ नि. ८ वरील आदेश

प्रस्तुतच्या कामी आरोपी क्र. २ यांनी जामीन अर्ज सादर केलेला आहे. या अर्जाला सरकारी वकील यांचे म्हणणे घेतलेले आहे. आरोपीच्या मते आरोपीचा घटनेशी कोणताही संबंध नाही. आरोपीविरुध्द कोणताही सबळ पुरावा नाही, आरोपीला नाहक त्रास देण्यासाठी अटक करण्यात आली आहे, आरोपीविरुध्द दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे, आरोपी ब–याच दिवसांपासून न्यायालयीन कोठडीत आहे, आरोपीची तब्येत ठिक नाही, त्याच्या उत्पन्नावर घर चालते अशा कारणामुळे जामीनाची मागणी करण्यात आली आहे.

२. सरकारी वकील यांनी या अर्जाला म्हणणे दिले असून त्यांच्यामते आरोपीविरुध्द गंभीर गुन्हा दाखल करण्यात आला आहे, आरोपीला जामीनावर सोडल्यास तो इतर गुन्हा करण्याची शक्यता आहे, आरोपी हा जामीन मंजूर झाल्यास तारखांना गैरहजर राहू शकतो, सबब त्याचा अर्ज नामंजूर करावा अशी मागणी करण्यात आली.

३. आरोपीच्या वकीलांचा युक्तवाद ऐकला. सरकारी वकील यांचा देखील युक्तीवाद ऐकला. दोषारोपपत्राचे अवलोकन केले. दोषारोपपत्र पाहता आरोपी यांनी भारतीय दंड विधान कलम ३९४ अन्वये गुन्हा केल्याने त्यांच्याविरुध्द दोषारोपपत्र पाठविण्यात आले. तसेच सदरचा गुन्हा गंभीर स्वरुपाचा आहे असे दिसून येते. गुन्हयाच्याकामी आरोपीचा संबंध दिसून येतो. हत्यार वापरुन गुन्हा करण्यात आला आहे. आरोपी हा परजिल्हयातील आहे. सबब एकंदरीत परिस्थीती पाहता जामीनावर मुक्त केल्यास आरोपी हजर राहील याची शाश्वती दिसून येत नाही. आरोपी यांच्याविरुध्द इतर ही गुन्हे असल्याचे दिसून येते. या कारणास्तव आरोपीला जामीन देणे न्यायोचित ठरणारे नाही. उलटपक्षी खटल्याचे कामकाज लवकरात लवकर चालविण्यात येईल. सबब खालील आदेश करण्यात येतो–

(CNRMHSN110002432022)

१. अर्ज नामंजूर करण्यात येतो.

VINAYAK DATTATRAY PATIL

Digitally signed by VINAYAK DATTATRAY PATIL
Date: 2022.04.06 10:53:08 +0530

आटपाडी (वि. द. पाटील )

दि.५.४.२०२२ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग आटपाडी

**Certificate**

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

Name of the Stenographer - H.P.Haridas
Court - Civil Judge Jr.Dn. Atpadi.
Date - 5.4.2022
Order signed by the
Presiding Officer on - 5.4.2022
Order uploaded on - 6.4.2022